# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-02.08.2026** **वार- रविवार**

---

**महाराजस्व शिबीर**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरामुळं महसूल प्रशासन अधिक पारदर्शक, गतीमान, लोकाभिमुख होईल,असा विश्वास राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील समाधानकारक पावसामुळे सर्व धरणं भरली असून जानाई- शिरसाई योजनेतून तालुक्यातील सर्व जलसाठे आणि तलाव तातडीने भरण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

त्या आज बारामतीतल्या सोमेश्वर इथं आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी त्यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्राथमिक स्वरुपात लाभ प्रमाणपत्राचं वितरण करण्यात आलं.

**सरहद**

पुणे आणि महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीशी एकरूप होऊन शांतता, एकता आणि प्रगतीचे दूत बना, असं आवाहन उपमुख्यमंत्री लोसी दिखो यांनी पुण्यात शिक्षण घेत असलेल्या मणिपुरी विद्यार्थ्यांना केलं.

ते आज पुण्यात गुजर निंबाळकरवाडी इथं सरहद संस्थेतर्फे स्वर्गीय श्रीमती जमनाबाई फिरोदिया ईशान्य भारत भवन आणि राणी गाइदीन्ल्यू मुलींच्या वसतीगृहाचं भूमिपूजन करताना बोलत होते.

**भाविक गर्दी**

जुन्नर तालुक्यातल्या अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या श्री क्षेत्र लेण्याद्री इथं गिरिजात्मज गणपतीच्या दर्शनासाठी आज संकष्टी चतुर्थीनिमित्त हजारो भाविकांनी गर्दी केली.

रविवारचा सुट्टीचा दिवस आणि निसर्गरम्य वातावरणामुळे भाविकांची संख्या मोठी होती. देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे आणि विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक तसंच महापुजा करण्यात आली.

**टपाल-उपक्रम**

रक्षाबंधनाच्या निमित्तानं पुणे टपाल विभागानं 'वनस्टॉप राखी सोल्यूशन' हा विशेष उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत देशभरासह परदेशातही राखी आणि सुरक्षित, जलद आणि विश्वासार्ह पद्धतीनं पाठविण्यासाठी सर्व सुविधा टपाल कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या उपक्रमाचा लाभ घ्यावा असं आवाहन पोस्टमास्टर जनरल प्रीती अग्रवाल यांनी केलं आहे.

**खराडी-केशवनगर**

पुण्यातला खराडी-केशवनगर पूल येत्या १५ ऑगस्टपर्यंत वाहतुकीसाठी खुला होणार आहे. या पुलाचं मुख्य बांधकाम पूर्ण झालं असून, केशवनगरकडच्या सातशे मीटर जोडरस्त्याचं काम वेगात सुरु आहे. पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी ही माहिती दिली.या पुलामुळं खराडी, मुंढवा,केशवनगर, मगरपट्टा, हडपसर,वाघोली आणि वडगाव शेरी भागातली वाहतूक कोंडी कमी होणार असून प्रवासाचा वेळही कमी होणार आहे.

**<u>बेकायदेशीर पिस्तूल विक्री</u>**

पुण्यातल्या येरवडा परिसरात बेकायदेशीर पिस्तूल विक्रीचा डाव पोलिसांनी उधळून लावत तीन जणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून एक पिस्तूल, काडतुसं, दुचाकी असा सुमारे ९० हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याच्या मोहिमेअंतर्गत गस्त घालताना ही कारवाई करण्यात आली.

**<u>धरण</u>**

खडकवासला धरणाच्या पाणी पातळीमध्ये झपाट्यानं वाढ होत असून पाणलोट क्षेत्रातही पावसाचं प्रमाण वाढलं आहे. त्यामुळं खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रात आज दुपारी दोन वाजता २४हजार२७७ क्युसेक्स इतका विसर्ग करण्यात आला.तसंच पावसाच्या प्रमाणानुसार विसर्ग पुन्हा कमी-जास्त करण्याची शक्यता आहे याची नोंद घ्यावी. कुणीही नदीपात्रात उतरू नये आणि नदीपात्रात काही साहित्य अथवा जनावरं असल्यास तात्काळ हलविण्यात यावीत, सर्वांनी योग्य ती खबरदारी घ्यावी असंही प्रशासनानं सांगितलं आहे.

**<u>धरण</u>**

पिंपरी चिंचवड परिसरातलं पवना धरण 99% भरलं आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात आणि घाटमाथ्यावर पडणाऱ्या पावसामुळं पवना धरणामध्ये मोठा येवा प्राप्त होत आहे. त्यामुळं पवना नदीपत्रात 1400 क्युसेक विसर्ग करण्यात येत आहे. हा विसर्ग 7हजार 500 क्युसेक पर्यंत टप्पा टप्प्यानं वाढवला जाईल.त्यामुळं पूर परिस्थिती उद्भवण्याची शक्यता असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**<u>कृषी उत्पन्न बाजार समिती</u>**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून 90 ट्रक शेतमालाची आवक झाली. आवक वाढल्यानं फ्लॉवर, ढोबळी मिरची आणि वांग्याच्या भावात घसरण झाली तर पालेभाज्यांचे भाव खाली आले आहेत. फळबाजारात मोसंबी,चिकू आणि पपईचे भाव वधारले आहेत.तर मागणी आणि आवक टिकून असल्यानं फुल बाजार मात्र स्थिर आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात पावसाच्या हलक्या सरी पडल्या.कमाल तापमान २९ दशांश अंश सेल्सिअस तर किमान तापमान २२ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही पावसाच्या हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे.तर घाट माथा परिसरात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**